नागपूर महानगरपालिका,
वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगरविकास विभाग,
शासन निर्णय-क्रमांक-नामपा-२०१७/प्र.क्र.४१/नवि-२६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २० सप्टेंबर,२०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४ दिनांक ०४ मे, २००६
२) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे पत्र क्र.४४३/आस्थापना, दिनांक ०४/०२/२०१७ व पत्र क्र.२५६/आस्थापना, दि०५/०८/२०१७
३) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे पत्र क्र.४८९/आस्थापना, दिनांक १२/०१/२०१८
४) समक्रमांक दिनांक ०९/०२/२०१८ चा शासन निर्णय
५) आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचे पत्र क्र.२१३/आस्थापना, दिनांक १९/०९/२०१९

प्रस्तावना :-

नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.३७६ दिनांक ०१/१२/२०१६ अन्वये, नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांच्या आकृतीबंधास व सेवाप्रवेश नियमांना मान्यता दिल्यानंतर, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.०२ येथील दिनांक ०४/०२/२०१७ च्या पत्रान्वये, "नागपूर महानगरपालिका आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम" यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाची मंजुरी प्राप्त होण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर केला होता.

तद्नंतर, यासंदर्भात महानगरपालिकेचे स्वत:चे आर्थिक उत्पन्न, सध्याचा आस्थापना खर्च आणि नवनिर्मित पदांसाठी होणारा खर्च या बाबींच्या पडताळणीअंती आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी, संदर्भाधीन क्र.०३ येथील पत्रान्वये सुधारित पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर केला आहे.

तद्नुसार, प्रस्तुत प्रस्तावास अनुलक्षून, उपरोक्त संदर्भाधीन क्र.०४ येथील शासन निर्णयान्वये, नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील २०१ पदांना प्रथम टप्प्यात शासनाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तद्नंतर, यासंदर्भात, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी, उपरोक्त संदर्भाधीन क्र.०५ येथील पत्रान्वये, नागपूर महानगरपालिकेत सफाई कामगारांची एकूण ३९३९ पदे मंजूर असून, सद्य:स्थितीत नागपूर महानगरपालिकेत ४४०७ ऐवजदार कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी बहुतांश ऐवजदार कर्मचारी साधारणपणे २० ते २५ वर्षापासून कार्यरत आहेत. त्यामुळे आकृतीबंधात

प्रस्तावित केलेली सफाई कर्मचाऱ्यांची वाढीव पदे मंजूर करुन सदर पदांवर सध्या कार्यरत असणाऱ्या ऐवजदार कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यास मान्यता देण्याबाबत, आयुक्त नागपूर महानगरपालिका यांनी विनंती केली आहे.

तद्नुसार, ऐवजदार कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याच्या अनुषंगाने, नव्याने ४४०७ अतिरिक्त पदांना मंजुरी देण्याबाबत आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.०५ येथील पत्रान्वये विनंती केली आहे. तद्नुसार यासंदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (४) नुसार वाढीव मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार या तरतुदीअन्वये शासनास असलेल्या अधिकारातंर्गत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

अ) नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांच्या पदांना यापूर्वी दिलेल्या मंजुरी व्यतिरिक्त, उपरोक्त संदर्भाधीन क्र.०३ येथील पत्रान्वये, नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील “सफाई कर्मचाऱ्यांच्या” प्रस्तावित केलेल्या वाढीव ४६२१ पदांपैकी ४४०७ इतकी “अधिसंख्य पदे” निर्माण करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

ब) या वाढीव पदांना मंजुरी देताना उपरोक्त संदर्भाधीन क्र.०१ मध्ये नमूद ३५% आस्थापना खर्चाची बाब “विशेष बाब” म्हणून शिथील करण्यात येत आहे.

क) अटी व शर्ती :-

१) या अधिसंख्य पदांवर सध्या कार्यरत असणाऱ्या ऐवजदार कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांकडे "ऐवजदार कार्ड” असेल आणि त्यांची किमान २० वर्षे नियमित सेवा झाली असल्याचे, आयुक्त नागपूर महानगरपालिका त्यांच्याकडील अभिलेखावरुन स्वत: प्रमाणीत करतील, अशा कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात यावे.

२) या मंजूर अधिसंख्य पदावर अशा कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अन्य कोणाचीही नियुक्ती करता येणार नाही. तसेच उपरोक्त प्रमाणे प्रमाणीत झालेल्या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात आल्यानंतर उपलब्ध असलेली अधिसंख्य पदे रिक्त ठेवण्यात यावीत.

३) सदरचे अधिसंख्य पद, कोणत्याही कारणास्तव रिक्त झाल्यास ते त्या दिनांकापासून आपोआप व्यपगत होईल.

४) यापुढे, कोणत्याही परिस्थितीत ऐवजदार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार नाही, याची जबाबदारी आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांची राहील.

५) अधिसंख्य पदे मंजूर करताना, या पदांच्या वेतनश्रेणीत तसेच श्रेणीवेतनात (ग्रेड-पे) सुधारणा प्रस्तावित केलेली नाही याची आयुक्त नागपूर यांनी स्वत: खात्री करावी.

६) पुढील आर्थिक वर्षापर्यंत महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५% च्या मर्यादेत येण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सत्वर सुरु करावी.

७) जोपर्यंत महापालिकेचा आस्थापना खर्च विहीत मर्यादेत येत नाही. तोपर्यंत नवीन पदनिर्मितीचा कोणताही प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येऊ नये.

८) ऐवजदार कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली अधिसंख्य पदे त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर आपोआप व्यपगत होत असल्याने, त्यांच्या वारसदारांना नियुक्ती देण्यासाठी कोणतेही अधिसंख्य पद निर्माण करण्यात येणार नाही अथवा व्यपगत झालेले पद पुनर्जिवित करता येणार नाही.

९) लाड-पागे समितीच्या शिफारशी उपरोक्त अटीसह या अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२०१०५१२३२२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.09.20 13:14:13 +05'30'

(सं.श.गोखले)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर
२) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक
३) निवडनस्ती (नवि-२६)